14

महाराष्ट्र शासन

क्र. एनजीसी-१००१/नमवि/(०१/२००१)मशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २९ जून. २००१.

प्रति,
कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ,
मुंबई

विषय : कायम विना अनुदान तत्वावर नवीन महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत..

संदर्भ : कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे पत्र क्र. Recong. I/ONC/५४४७ of २०००, दिनांक २१ डिसेंबर २०००.

महोदय,

आपल्या विद्यापीठामार्फत सन २००१-२००२ या शैक्षणिक वर्षासाठी नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांमध्ये मुंबई प्रदेश आर्य विद्या सभा, घाटकोपर (पूर्व), मुंबई-७७ या संस्थेस घाटकोपर (पूर्व), मुंबई या ठिकाणी वाणिज्य अभ्यासक्रमाचे महाविद्यालयास परवानगी मिळण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर संस्था वाणिज्य अभ्यासक्रमाचे महाविद्यालय कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास तयार असून त्या आशयाचे हमीपत्र संस्थेने शासनास सादर केले आहे. या बाबी विचारात घेऊन मुंबई प्रदेश आर्य विद्या सभा, घाटकोपर (पूर्व), मुंबई-७७ या संस्थेस घाटकोपर (पूर्व), मुंबइ या ठिकाणी सन २००१-२००२ या शैक्षणिक वर्षापासून वाणिज्य या विद्याशाखेचे महाविद्यालय सुरु करण्यास महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ मधील कलम ८२(५) नुसार पुढील अटींच्या अधिन मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर महाविद्यालयास दिलेली मान्यता ही कायम विना अनुदान तत्वावर असून या महाविद्यालयास भविष्यात कोणत्याही प्रकारचे अनुदान किंवा आर्थिक मदत शासनाकडून देण्यात येणार नाही.

२) या महाविद्यालयास शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या आर्थिक बाबींसंबंधीची सर्वस्वी जबाबदारी स्वीकारणे संस्थेवर बंधनकारक आहे.

(कृपया मागे पहा.)

३) कायम विना अनुदान तत्वावर संस्थेस महाविद्यालय आर्थिकदृष्ट्या चालविणे शक्य व्हावे, यासाठी संस्थेने विद्यार्थ्यांकडून किती शुल्क आकारावे हे विद्यापीठाकडून मंजूर करुन घ्यावे.

२. सदर महाविद्यालयाने वरील सर्व बाबींची पूर्तता केल्यास त्या अधिन महाविद्यालयास संलग्नीकरण देण्याबाबत विद्यापीठाने कार्यवाही करावी व अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे तथा संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण यांना सादर करावा.

आपला,

श्री. रा. जोशी

( श्री. रा. जोशी )

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई

३) अध्यक्ष/सचिव, मुंबई प्रदेश आर्य विद्या सभा, घाटकोपर (पूर्व). मुंबई-७७

४) मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) मा. उप मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

६) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी-सचिव, मंत्रालय, मुंबई.

७) मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

८) निवडनस्ती/मशि-३